यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac

**जा.क्र.**: यचममुवि/नोंदणी कक्ष/२०२५/**२५४** दि. १६/०९/२०२५

## सूचना पत्र क्र. १५

### सेवांतर्गत बी. एड. (P80) सन २०२५-२७ या तुकडीचे खुल्या व राखीव प्रवर्गातील (द्वितीय) प्रवेश फेरी सूचना

सेवांतर्गत बी. एड. शिक्षणक्रमाच्या सन २०२५-२७ या तुकडीसाठी प्रवेश घेऊन इच्छिणाऱ्या प्रवेशेच्छुक उमेदवारांच्या ऑनलाईन प्रवेश अर्जाची मूळ कागदपत्र पडताळणी विद्यापीठाच्या विभागीय केंद्रावर घेण्यात आली.

प्रथम कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची जिल्हानिहाय गुणवत्तेनुसार खुल्या आणि राखीव प्रर्वागातील उमेदवारांच्या प्रवेशासाठी यादी स्वतंत्र प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१) निवड यादीतील उमेदवारांनी त्यांचे प्रथम वर्षाचे प्रवेश शुल्क रू. २३,३८०/- (माहितीपुस्तिकेतील पान क्र. २३ वर नमूद केल्याप्रमाणे) **दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ (रात्री ११.५९ PM पर्यंत)** ऑनलाईन पद्धतीने डेबिट/क्रेडीट कार्ड, नेटबँकिंग यूपीआय इत्यादीचा वापर करून भरावयाचे आहे. सदर प्रथम वर्ष शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरण्याची सोय संबंधित उमेदवाराच्या लॉगीनमध्ये उपलब्ध आहे. प्रथम वर्षाचे शुल्क भरल्यानंतरच आपला बी. एड. शिक्षणक्रमाचा सन २०२५-२०२७ या तुकडीसाठी प्रवेश निश्चित होईल. विहित मुदतीत प्रथम वर्ष शुल्क उमेदवारांनी न भरल्यास संबंधित उमेदवार बी. एड. प्रवेश प्रक्रियेतून बाद होईल आणि पुढील प्रवेश प्रक्रिया फेरीसाठी विचार केला जाणार नाही, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) प्रथम वर्ष शुल्क यशस्वीपणे भरणाऱ्या विद्यार्थ्यांना आपला पासवर्ड व लॉगीन आयडी टाकून बी. एड. सन २०२५-२७ प्रवेशाचे पत्र डाऊनलोड करता येईल. त्याच्या दोन प्रती काढून त्यातील एक प्रत आपल्या जिल्ह्यासाठी नियुक्त बी. एड. अभ्यासकेंद्रावर (माहितीपुस्तिकेतील पान क्र. २५ ते २८ वर नमूद केलेल्या ठिकाणी) जाऊन जमा करावे. तसेच पुढील पत्रव्यवहारासाठी संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा व कायमस्वरूपी पत्ता, मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक इत्यादी माहिती अभ्यासकेंद्रावर देण्यात यावी.

३) अभ्यासकेंद्रामार्फत आपणास बी. एड. शिक्षणक्रमातील अध्ययन साहित्य प्रथम संपर्कसत्रात देण्यात येईल. वैकल्पिक अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती आणि पूरक अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या https://ycmou.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर Books: Free Download (PDF) या टॅबवर सॉफ्टकॉपीमार्फत PDF/E-book स्वरूपात उपलब्ध करून दिलेले आहेत, याची नोंद घ्यावी.

४) **आपण वर दिलेल्या मुदतीतच प्रवेश घेणे अनिवार्य आहे.** जागा रिक्त राहिल्यास त्याच जिल्ह्यातील कागदपत्र पडताळणी झालेल्या पुढील उमेदवारांना गुणवत्तेनुसार संधी देण्यात येईल.

५) बी. एड. सन २०२५-२७ प्रथम वर्ष शुल्क भरताना प्रोफाईल अपूर्ण असल्यास Fill complete profile असा मेसेज आल्यास डाव्या हाताला असणाऱ्या लिंकपैकी Fill complete profile या लिंकचा वापर करून आपली प्रोफाईल पूर्ण करून प्रथम वर्ष शुल्क भरावे. तसेच **ABC ID व DEB ID कसा तयार करावा. याबाबत शंका असल्यास सूचना पत्र क्र. ८ च्या खाली लिंक उपलब्ध आहे.** त्यानुसार कार्यवाही करावी.

६) उमेदवारांना बी. एड. सन २०२५-२७ प्रथम वर्ष शुल्क भरताना काही अडचण आल्यास कृपया ०२५३-२२३०५८० या क्रमांकावर संपर्क साधावा.

समन्वयक,
बी.एड्. शिक्षणक्रम

संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा